कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय, सातारा

*नियामक मंडळ (गव्हर्निंग बॉडी) सभा क्र. १० दि. ३०.१२.२०२३*

# नियामक मंडळ (गव्हर्निंग बॉडी)

## सभा क्र. १०

- वार :- शनिवार
- दिनांक :- ३०.१२.२०२३
- वेळ :- दुपारी १२.०० वाजता
- स्थळ :- कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय, सातारा

# विषयावरील ठराव

# (इतिवृतांत)

**कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय, सातारा**

सदर बझार, आर.टी.ओ. ऑफिस जवळ, सातारा

फोन नं. ०२१६२-२३०६३६, २३५७६७, २३३००५

ईमेल - office@kbpcoes.edu.in

वेबसाईट - www.kbpcoes.edu.in

# कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय, सातारा

*नियामक मंडळ (गव्हर्निंग बॉडी) सभा क्र १०. दि. ३०.१२.२०२३ इतिवृतांत*

**जा. क्र. ग.ब.स./सभा १०/२०२३/** **दि. - ३०.१०.२०२३**

**नियामक मंडळ (गव्हर्निंग बॉडी) सभा क्र. १०**
**दिनांक - ३०.१२.२०२३**
**वेळ - दुपारी १२.०० वाजता**
**स्थळ - कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय, सातारा**

या महाविद्यालयाची नियामक मंडळ (गर्व्हनिंग बॉडी) ची दहावी सभा **शनिवार दि. ३०.१२.२०२३ रोजी दुपारी १२.०० वाजता** मा. ना. दिलीप वळसे पाटील साहेब - चेअरमन नियामक मंडळ (गर्व्हनिंग बॉडी) यांचे अध्यक्षतेखाली आयोजित केलेली आहे. तरी सर्व सन्माननीय सदस्यांनी सभेस उपस्थित राहून मार्गदर्शन करावे, ही विनंती.

## विषय – पत्रिका

| विषय | विषय | पान क्र. |
|---|---|---|
| विषय क्र. १ | मागील नियामक मंडळ (गव्हर्निंग बॉडी) सभा क्र ०९. दि. ०४.०९.२०२३ रोजीच्या सभेचे इतिवृत्तांत वाचून कायम करणे व घेतलेल्या निर्णयाची माहिती देणे. | |
| विषय क्र. २ | महाविद्यालयात राबविण्यात आलेल्या विविध उपक्रमाबाबत माहिती देणे. | |
| विषय क्र. ३ | शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून **Artificial Intelligence & Data Science** नवीन विद्याशाखा सुरु करणे व **Computer Science & Engineering** विद्याशाखेची प्रवेशक्षमता वाढविणे. त्यासाठी लागणाऱ्या प्रयोगशाळा तयार करणे व शिक्षक शिक्षकेत्तर सेवक भरणेबाबत चर्चा करणे. | |
| विषय क्र. ४ | महाविद्यालयातील कार्यरत असलेले व सेवानिवृत्त झालेल्या सेवकांनी सादर केलेल्या विविध अर्जाबाबत चर्चा करणे. | |
| विषय क्र. ५ | महाविद्यालयात नियमित शिक्षक व शिक्षकेत्तर सेवक भरणेबाबत चर्चा करणे. | |
| विषय क्र. ६ | AICTE च्या नियमानुसार महाविद्यालयात Central Store तयार करणे व त्याकरिता आवश्यक Store Keeper च्या नियुक्ती बाबत चर्चा करणे. | |
| **विषय क्र. ०७** | **महाविद्यालयातील प्रशासकीय व आर्थिक बाबीविषयी मंजुरी घेणे.** | |
| विषय क्र. ०७.०१ | महाविद्यालयातील Exam Centre Renovation, बाथरूम रेनोव्हेशन करणेकामी येणाऱ्या जादा खर्चास मंजुरी घेणेबाबत. | |
| विषय क्र. ०७.०२ | महाविद्यालयातील संगणक विभागाकरिता नवीन ४० संगणक खरेदी करणेस परवानगी मिळणेबाबत. | |
| विषय क्र. ०७.०३ | महाविद्यालयाच्या Building Passage मधील Flooring बदलण्यास परवानगी मिळणेबाबत. | |
| विषय क्र. ०७.०४ | महाविद्यालयातील जिमखाना विभागातील Open Gym Equipment, Training & Placement च्या विभागात Round Table आणि दोन AC , Sanitary Napkin Vending Machine खरेदी करणेस परवानगी मिळणेबाबत. | |
| विषय क्र. ०७.०५ | महाविद्यालयातर्फे देण्यात येणाऱ्या ERP च्या प्रलंबित बिलाबाबत. | |

# कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय, सातारा

## *नियामक मंडळ (गव्हर्निंग बॉडी) सभा क्र १०. दि. ३०.१२.२०२३ इतिवृतांत*

| **विषय क्र. ०८** | **मा. चेअरमन यांचे परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयावर चर्चा करणे.** | |
|---|---|---|
| विषय क्र. ०८.०१ | संगणक विभाग नुतनीकरणास आलेल्या वाढीव खर्चास परवानगी मिळणेबाबत. | |
| विषय क्र. ०८.०२ | नवीन इलेक्ट्रिकल 90, 120 Square MM Aluminium Armad Cable खर्चास परवानगी मिळणेबाबत. | |
| विषय क्र. ०८.०३ | महाविद्यालयाचे वस्तीगृह यशवंतराव चव्हाण सायन्स कॉलेज, सातारा यांना वापरण्यास दिल्या बाबत. | |
| विषय क्र. ०८.०३ | भविष्य निर्वाह निधी, कोल्हापूर यांच्या कडून आलेल्या PF दंड भरणेस परवानगी मिळणे बाबत. | |

**प्राचार्य तथा सचिव**
नियामक मंडळ (गर्व्हनिंग बॉडी)
कर्मवीर भाऊराव पाटील
अभियांत्रिकी महाविद्यालय, सातारा

प्रत - सर्व सन्मानीय सदस्य - नियामक मंडळ

# कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय, सातारा

*नियामक मंडळ (गव्हर्निंग बॉडी) सभा क्र १०. दि. ३०.१२.२०२३ इतिवृतांत*

**जा. क्र. ग.ब.स./सभा १०/२०२३/** **दि. - ३०.१०.२०२३**

**नियामक मंडळ (गव्हर्निंग बॉडी) सभा क्र. १०**

**दिनांक - ३०.१२.२०२३**

**वेळ - दुपारी १२.०० वाजता**

**स्थळ - कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय, सातारा**

कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय सातारा या महाविद्यालयाची नियामक मंडळ (गव्हर्निंग बॉडी) ची दहावी सभा **शनिवार दि. ३०.१२.२०२३ रोजी दुपारी १२.०० वाजता** मा. ना. दिलीप वळसे पाटील साहेब - चेअरमन नियामक मंडळ (गर्व्हनिंग बॉडी) यांचे अध्यक्षपदी संपन्न झाली. या सभेस खालील मान्यवर उपस्थित होते.

**उपस्थित सदस्य –**

| अ.क्र. | सदस्य नाव | पद |
|---|---|---|
| १. | मा. ना. दिलीप वळसे - पाटील साहेब | चेअरमन |
| २. | मा. श्री. चंद्रकांत दळवी साहेब<br>चेअरमन, रयत शिक्षण संस्था, सातारा | निमंत्रित |
| ३. | मा. श्री. विकास देशमुख साहेब<br>सचिव, रयत शिक्षण संस्था, सातारा | सदस्य |
| ४. | मा. प्रतापराव पवार | सदस्य |
| ५. | मा. डॉ. एन. बी. पासलकर | सदस्य |
| ६. | प्रा. डॉ. एम बी कुमठेकर | सदस्य |
| ७. | मा. श्री. उदय जाधव | सदस्य |
| ८. | डॉ. सौ. एस. जे. मोदी | सदस्य |
| ९. | डॉ. सौ. एस. व्ही. माने | सदस्य |
| १०. | प्रा. डॉ. ए. सी. अत्तार | सदस्य / सचिव |

सर्वप्रथम सभेचे सदस्य सचिव तथा मा. प्राचार्य यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत केले आणि मा.ना. दिलीप वळसे पाटील साहेब महाविद्यालयाचे नियामक मंडळाचे चेअरमन यांच्या अध्यक्षतेखाली सभेच्या कामकाजास सुरुवात झाली.

# कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय, सातारा

***नियामक मंडळ (गव्हर्निंग बॉडी) सभा क्र १०. दि. ३०.१२.२०२३ इतिवृतांत***

## विषयावरील ठराव

**विषय क्र. १** :- मागील नियामक मंडळ (गव्हर्निंग बॉडी) सभा क्र ०९. दि. ०४.०९.२०२३ रोजीच्या सभेचे इतिवृत्तांत वाचून कायम करणे व घेतलेल्या निर्णयाची माहिती देणे.

**ठराव क्र. १** :- मागील नियामक मंडळ (गव्हर्निंग बॉडी) सभा क्र. ०९, दि. ०४.०९.२०२३ रोजीच्या इतिवृत्तांचे अवलोकन करून तो मंजूर करणेत यावा अशी विनंती आहे. तसेच मागील नियामक मंडळ (गव्हर्निंग बॉडी) सभा क्र. ०९, दि. ०४.०९.२०२३ मध्ये घेणेत आलेल्या निर्णयावरील कार्यवाही ठरावाअनुक्रमे खालील प्रमाणे आहे.

| ठराव | निर्णय | निर्णयावरील कारवाई |
|---|---|---|
| ठराव क्र.०१. | मा. ना. दिलीप वळसे पाटील साहेब यांची महाराष्ट्र राज्य मंत्रीमंडळात सहकार मंत्री पदी निवड झाल्याबद्दल हार्दिक अभिनंदन..... | सर्वांच्या वतीने हार्दिक अभिनंदन केले. |
| ठराव क्र.०२. | मागील नियामक मंडळ (गव्हर्निंग बॉडी) सभा क्र ०८. दि. १६.०२.२०२३ रोजीच्या सभेचे इतिवृत्तांत वाचून कायम करणे व घेतलेल्या निर्णयाची माहिती देणे. | मागील सभेचा इतिवृत्तांत वाचून सर्व सहमतीने कायम करणेत आला. |
| ठराव क्र.०३. | महाविद्यालयातील विविध शैक्षणिक व प्रशासकीय कामकाजाबाबत. | **मुद्दा क्र. ०१.** सदर बाबतचा प्रस्ताव तयार करणेत आलेला आहे. सदर प्रस्ताव सभेस अवलोकनास ठेवत आहे.<br>**मुद्दा क्र. ०२.** सिव्हील व मेकॅनिकल इंजिनिअरिंग या विभागातील सर्व सेवकांना प्रवेशासंदर्भात नोटीस व कार्यालयीन आदेशाद्वारे कळविणेत आले आहे.<br>**मुद्दा क्र ०३. व ०४.** विविध उपक्रम व Induction Programme बाबत सभेने अवलोकन करून समाधान व्यक्त केले.<br>**मुद्दा क्र ०५.** पुढील NAAC चे मुल्यांकन हे A++ मिळविणेसाठी IQAC विभागामार्फत कामकाज सुरु केलेले आहे. याबाबतची माहिती सभेसमोर ठेवत आहे. |
| ठराव क्र.०४. | प्राचार्य पदाचा कार्यकाळ माहे फेब्रुवारी २०२४ ला पूर्ण होत आहे याबाबत चर्चा करणे. | याबाबत सभेने चर्चा करून प्राचार्य यांची फेरनियुक्ती करणेस परवानगी दिली. |
| ठराव क्र.०५. | महाविद्यालय स्वायत्त्य (Autonomy) करणेबाबत चर्चा करणे. | महाविद्यालयाचे दुसरे NAAC पुर्नमुल्यांकन सन २०२४-२५ मध्ये असल्याने त्यासाठी लागणारी तयारी पूर्ण करून NAAC चे मानाकन A++ मिळणेसाठी प्रयत्न करावे व शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये Autonomy प्रस्ताव द्यावा असे सभेने सूचित केले. |

कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय * सातारा *

# कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय, सातारा

## नियामक मंडळ (गव्हर्निंग बॉडी) सभा क्र १०. दि. ३०.१२.२०२३ इतिवृतांत

| | | |
|---|---|---|
| ठराव क्र.०६. | महाविद्यालयाच्या कार्यालयातील सहाय्यक प्रशासकीय अधिकारी (Assistant Administrative Officer) श्री. धनवडे विलास बाबुराव यांना नेमणूक आदेश मिळणेबाबत. | संस्था स्तरावर कायम नेमणूक आदेश देण्यात आलेला आहे. |
| ठराव क्र.०७. | महाविद्यालयातील नियामक मंडळा (BOG) मध्ये नवीन शिक्षक प्रतिनिधीची नियुक्ती करणेबाबत चर्चा करणे व महाविद्यालयामध्ये स्थानिक व्यवस्थापन समिती गठीत करणेबाबत चर्चा करणे. | डॉ. मोदी शबिना जमीर यांची रिक्त जागेवर निवड केली. तसेच विद्यापीठास नियामक मंडळ (BOG) कार्यरत असताना स्थानिक व्यवस्थापन समिती (LMC) स्थापन करावी का? याबाबत मार्गदर्शन मागविले आहे. |
| ठराव क्र.०८. | महाविद्यालयामध्ये कार्यरत असणाऱ्या ADHOC शिक्षक व कंत्राटी पद्धतीने काम करत असणाऱ्या शिक्षकेत्तर सेवकांच्या पगार / मानधन वाढी बाबत चर्चा करणे. तसेच शैक्षणिक वर्ष २०२३-२४ करिता संस्थेमार्फत रीतसर मुलाखती घेऊन नेमणूक केलेल्या adhoc शिक्षक सेवकांची नेमणूक आदेश व वेतन अदा करणेस परवानगी मिळणेबाबत. | **संस्था स्तरावर नेमणूक आदेश देण्यात आले.** तसेच हंगामी (ADHOC ) शिक्षक सेवकांना दरमहा वेतन अदा करण्यास व नेमणूक आदेश मिळण्यास सभेने परवानगी दिली. |
| ठराव क्र.०९. | कायम शिक्षक सेवकांनी केलेल्या विविध मागणी अर्जाबाबत व डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे यांच्या कडून आलेल्या सातव्या वेतन आयोगाची अंमबलबजावणी करणेबाबत आलेल्या पत्राबाबत चर्चा करणे. | याबाबत समिती गठीत करणेत आलेली आहे. तसेच गठीत करणेत आलेल्या समिती ला पत्राद्वारे कळविणेत आलेले आहे. सदर समितीची सभा आयोजित करून याबाबत निर्णय घेण्यात येणार आहे. |
| ठराव क्र.१०. | महाविद्यालयातील कायमस्वरूपी शिक्षक व शिक्षकेत्तर सेवक हे नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होत आहेत तरी सेवानिवृत्त झालेल्या सेवकांच्या जागेवर नवीन शिक्षक व शिक्षकेत्तर सेवकांची नियमितपणे भरती करणेबाबत चर्चा करणे. | रिक्त असलेल्या शिक्षकेत्तर पद भरती कंत्राटी पद्धतीने भरणेबाबत सभेने सुचविले व त्यासाठी लागणारी GST रक्कम भरावी लागत असेल तरी चालेल असे सभेने सुचविले. सदर मुद्द्या बाबत महाविद्यालया स्तरावर कार्यवाही सुरु आहे. |
| ठराव क्र.११. | महाविद्यालयातील सेवकांनी केलेल्या कोर्ट केस बाबतची चर्चा करणे. | मुंबई हायकोर्ट येथे संस्थेच्या वकीलामार्फत संस्थेची व महाविद्यालयाची बाजू मांडावी असे सुचविले आहे त्यानुसार कार्यवाही सुरु आहे. |
| ठराव क्र.१२. | **महाविद्यालयातील प्रशासकीय व आर्थिक बाबीविषयी मंजुरी घेणे.** | |
| ठराव क्र. १२.१. | प्रलंबित देयके अदा करणेकामी मंजुरी घेणे. | सदरची बिले चालू आर्थिक वर्षात खर्ची टाकून बिलाची रक्कम अदा करणेत आली आहे. |
| ठराव क्र. १२.२. | सुधारित दराने प्रवास व दैनिक भत्ता देणेबाबत चर्चा करणे. | याबाबत तक्ता तयार करणेत आलेला आहे. सोबत तो तक्ता अवलोकनास जोडलेला आहे. |
| ठराव क्र. १२.३. | महाविद्यालयाच्या सभागृह व विभागाकरिता नवीन खुर्च्या, 160 KV Generator, Interactive Panel / Smart Board खरेदी, Exam Centre Renovation, क्लासरूम रेनोव्हेशन व बाथरूम रेनोव्हेशन करणेकामी मंजुरी घेणे. | सभेने नोंद घेतली व चर्चा करून रेनोव्हेशन करणेस परवानगी दिली. |

कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय सातारा

# कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय, सातारा

## नियामक मंडळ (गव्हर्निंग बॉडी) सभा क्र १०. दि. ३०.१२.२०२३ इतिवृतांत

| | | |
|---|---|---|
| ठराव क्र. १२.४. | महाविद्यालयाचे सभागृह भाडे तत्वावर देणे व दरपत्रकाबाबत चर्चा करणे. | सभेत ठेवण्यात आलेल्या तक्त्यानुसार भाडे आकारण्यास परवानगी दिली. |
| ठराव क्र. १२.५. | सुरक्षा रक्षक यांची ऑनलाईन निवेदाद्वारे रीतसर नेमणूक करणेत आलेली होती. सदर नेमणूक कालावधी माहे फेब्रुवारी २०२३ रोजी पूर्ण झाली असून माहे मार्च २०२३ पासून दरमहा दिलेल्या आदेशानुसार वेतन अदा करणेस परवानगी मिळावी.. | वेतन अदा करणेस सभेने चर्चा करून परवानगी दिली. त्यानुसार कार्यवाही करणेत आली आहे. |
| ठराव क्र. १२.६ | द्वितीय वर्ष सिव्हील मधील विद्यार्थी गौरव गाडे फी माफीबाबत. | विद्यार्थ्याच्याआर्थिक परिस्थितीचा विचार करून फी माफ करण्यास परवानगी दिली व शैक्षणिक इतर कागदपत्रे देण्यात यावी असे सुचवले. |
| ठराव क्र. १३ | **मा. चेअरमन यांचे परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयावर चर्चा करणे.** | |
| ठराव क्र. १३.१ | महाविद्यालयातील Consultancy Remuneration बाबत चर्चा करणे. | Consultancy Remuneration बाबत COE PUNE यांच्या मार्गदर्शन तत्वानुसार निर्णय घेण्याचे ठरले. |
| ठराव क्र. १३.२ | महाविद्यालयाच्या सर्वंगीण विकासासाठी महाविद्यालयाचे शिक्षक सेवक यांना इतर संस्था मध्ये माहिती घेण्यास पाठविणे व सेवकांच्या करिता Attitude Training घेणेबाबत. | महाविद्यालयाच्या सर्वंगीण विकासासाठी महाविद्यालयाचे शिक्षक सेवक यांना इतर संस्था मध्ये माहिती घेण्यास पाठविणे व सेवकांच्या करिता Attitude Training घेणेबाबत सुचवण्यात आले. |

**वरील तक्त्यानुसार मागील नियामक मंडळ सभा क्र. ०९ मधील सर्व ठराव मा. प्राचार्य यांनी सभेस सांगितले व त्यानुसार सभेने अवलोकन केले.**

**सूचक :- डॉ. सौ. माने एस. व्ही.**
**अनुमोदक :- मा. विकास देशमुख**
**ठराव सर्वानुमते मंजूर**

कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय * सातारा *

# कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय, सातारा

*नियामक मंडळ (गव्हर्निंग बॉडी) सभा क्र १०. दि. ३०.१२.२०२३ इतिवृतांत*

**विषय क्र. २ :- महाविद्यालयात राबविण्यात आलेल्या विविध उपक्रमाबाबत माहिती देणे.**

**ठराव क्र २:- १. NBA कमिटीने महाविद्यालयास दिलेल्या भेटी बाबत-** दि. १९.०५.२०२३ ते दि. २१.०५.२०२३ रोजी महाविद्यालयात NBA कमिटीने सिव्हील इंजिनिअरींग, कॉम्प्युटर सायन्स & इंजिनिअरिंग व मेकनिकल इंजिनिअरींग या विभागाचे मुल्यांकन करणेसाठी भेट दिली. सदर कमिटीच्या अहवालानुसार महाविद्यालयातील Computer Science & Engineering व Civil Engineering या दोन विद्याशाखेस NBA Accreditation तीन वर्षाकरिता प्राप्त झाले आहे.

महाविद्यालयातील Computer Science & Engineering व Civil Engineering या दोन विद्याशाखेस NBA Accreditation तीन वर्षाकरिता प्राप्त झाल्याबद्दल मा. प्राचार्य, **NBA coordinator**, सर्व विभागप्रमुख, शिक्षक व शिक्षकेत्तर सेवकांचे अभिनंदन.

**२. महाविद्यालयातील शिक्षक व विद्यार्थ्यांसाठी विविध उपक्रम व कार्यक्रमाचे आयोजन करणेत आले होते. या उपक्रमांची माहिती खालीलप्रमाणे.**

१. Vice Chancellor research proposal grant अंतर्गत डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे यांचेकडून डॉ. शबिना मोदी व प्रा. गणेश दांगट विभागप्रमुख कॉम्पुटर सायन्स ॲण्ड इंजिनिअरींग यांनी सादर केलेल्या research proposal करिता **२ लाख १४ हजार रुपये** research grant मंजूर झाली.

२. National Level **"Segue 2.0"** Global Design Thinking Challenge ( Launched by School of Future Skills, AICTE in Collaboration with NIET, Greater Noida) राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेमध्ये महविद्यालयातील मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभागातील आकाश बोतालजी,अथर्व धुमाळ, अमन देशमुख, यश चित्रगार या विद्यार्थांनी सहभाग घेतला होता. यामध्ये त्यांना द्वितीय क्रमांक व **रक्कम रुपये ५००००/-** व पारितोषक मिळाले.




**मार्गदर्शक डॉ. पी. एल. जाधव**

कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय * सातारा *


३. शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये महाविद्यालयास NAAC कमिटी भेट देत असल्याने महाविद्यालयाच्या IQAC विभागामार्फत "Outcome Based Education & Academic Quality Assurance" या विषयावर Faculty Development Program दि. ११/१२/२०२३ ते १५/१२/२०२३ या कालावधीत घेण्यात आला. या वर्कशॉप चे उद्घाटन मा. प्राचार्य डॉ. ज्ञानदेव म्हस्के सहसचिव ( उ. शि.) यांच्या हस्ते झाले. या वर्कशॉप मध्ये ६१ प्राध्यापक सहभागी झाले होते.






**को-ऑर्डीनेटर - डॉ. सुनिता माने, डॉ. शबिना मोदी**

४. One week ISTE approved Faculty Development Program on **Research Grants and Patents** from 4th Dec to 8th Dec 2023. (Online & Offline Mode)
वरील प्रोग्राम मध्ये १०० पेक्षा जास्त प्राध्यापकांनी सहभाग नोंदविला होता यामध्ये महाराष्ट्र व महाराष्ट्राच्या बाहेरील प्राध्यापकांचा सहभाग होता.



**को-ऑर्डीनेटर डॉ. शबिना मोदी, प्रा टी. जे. शेख**

५. डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे व कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, सातारा यांच्या संयुक्त विद्यमानाने **"Cloud Computing & it's tools & services"** या विषयावर दि. २८/०८/२०२३ ते ०१/०९/२०२३ ISTE approved Faculty Development Program घेण्यात आला यामध्ये महाराष्ट्र व महाराष्ट्राच्या बाहेरील प्राध्यापकांचा सहभाग होता.




**को-ऑर्डीनेटर डॉ. शबिना मोदी, प्रा. गणेश दांगट**

६. कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, सातारा व रयत शिक्षण संस्थेच्या विविध महाविद्यालयातील विद्यार्थ्यांकरिता **Karmaveer Fest 2K23** स्पर्धात्मक कार्यक्रमाचे दि. २८.१०.२०२३ रोजी आयोजन करणेत आले होते. सदर कार्यक्रमात विविध महाविद्यालयातील ४० टीमनी Singing, Dancing, Mimicry, Mime , Drama इ. स्पर्धेत सहभाग घेतलेला होता. या कार्यक्रमासाठी प्रमुखपाहुणे डॉ. अशोक भोईटे साहेब जनरल बॉडी सदस्य रयत शिक्षण संस्था, सातारा हे उपस्थित होते, मा. सहसचिव प्राचार्य डॉ. ज्ञानदेव म्हस्के यांच्या हस्ते कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले यावेळी मा. बी. एन. पवार सहसचिव (माध्य), ऑडीटर प्राचार्य डॉ. शिवलिंग मेनकुदळे, प्राचार्य, शिक्षक, शिकक्षेतर सेवक उपस्थित होते.




**को-ऑर्डीनेटर - डॉ. शबिना मोदी, प्रा टी. जे. शेख**

७. महाविद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे यांच्या मार्गदर्शन तत्वानुसार **Avishkar Research competition** 2023 चे आयोजन दि. ०४/११/२०२३ रोजी करण्यात आले होते त्यामध्ये ६२ विद्यार्थी सहभागी झाले होते त्यापैकी १२ विद्यार्थ्यांची झोनल स्पर्धेकरिता निवड झाली त्यामधून महाविद्यालयाचा हर्ष कांबळे TY E&Tc Engineeing च्या विद्यार्थ्यांची विद्यापीठ स्तरावर competition करिता निवड झाली.




**को-ऑर्डीनेटर - डॉ. पोपट पाटील**

८. दि. १५.०९.२०२३ रोजी Engineer's Day कार्यक्रमाचे महाविद्यालयात आयोजित केले होते यामध्ये **"Digital Poster Presentation"** Activity घेण्यात आली यामध्ये १७१ विद्यार्थांनी सहभाग घेतला होता.



**को-ऑर्डीनेटर - प्रा. अनुजा देसाई**

९. रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक परमपूज्य कर्मवीर भाऊराव पाटील उर्फ अण्णांच्या जयंतीनिमित्त महाविद्यालयात दि. २१.०९.२०२३ रोजी **Elocution & Drawing Competition** घेण्यात आल्या, त्यामध्ये Elocution competition स्पर्धेमध्ये ०७ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला व Drawing स्पर्धेमध्ये १६ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.



**को-ऑर्डीनेटर - प्रा. कस्तुरी पवार**

कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय * सातारा *

१०. **Smart India Hackathon competition** 2023 या National level competition मध्ये महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा सहभाग व्हावा याकरिता Internal Smart India Hackathon competition 2023 चे आयोजन करणेत आलेले होते यामध्ये **विद्यार्थ्यांचे ५० ग्रुप** सहभागी झाले होते त्यापैकी आपल्या माविद्यालयातील **एका ग्रुपची National level competition करिता निवड** झाली असून विद्यार्थी Rungta College of Engineering & Technology Chhattisgarh येथे Coding competition करिता सहभागी झाले.




**को-ऑर्डीनेटर - प्रा. अनिरुद्ध क्षीरसागर, प्रा. मोनिका सोनमळ**

११. महाविद्यालयातील संगणक विभागामार्फत Three Days Hands on Workshop on **Drone Designing and Flying** हा उपक्रम दि. ०३.११.२०२३ ते ०५.११.२०२३ या कालावधीत घेण्यात आला. यामध्ये विविध महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला व विविध प्रकारच्या Drone Designing चे प्रात्यक्षिक करणेत आले.



**को-ऑर्डीनेटर प्रा. गणेश दांगट**

१२. महाविद्यालयातील संगणक विभागामार्फत One day Webinar on **Generative AI** हा उपक्रम इंडस्ट्री मार्फत दि. २६.०९.२०२३ रोजी आयोजित करणेत आलेला होता.

**को-ऑर्डीनेटर प्रा. अनिरुद्ध क्षीरसागर,**

१३. **Research and development Committee च्या अंतर्गत शैक्षणिक वर्ष 2023 मध्ये खालील उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.**

दि. १३.०६.२०२३ मध्ये National Conference in **Recent Trends in Engineering and Technology** चे आयोजन करण्यात आले. यामध्ये एकूण ७० शोधनिबंध विविध विभागातील विद्यार्थ्यांनी सादर केले. **Practical Aspects of Intellectual Property Right (IPR)** या विषयावर ॲडव्होकेट सौरभ रायरीकर यांचे व्याख्यान दि. १३.१०.२०२३ रोजी आयोजिन करण्यात आले.



**को-ऑर्डीनेटर डॉ. आनंद तपासे, डॉ. शाहीन शेख**

१४.दि. 12/12/2023 रोजी रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष **आदरणीय खासदार शरदचंद्र पवारसाहेब** यांच्या वाढदिवसानिमित्त कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, सातारा येथे **रक्तदान शिबिराचे** आयोजन करण्यात आले होते यामध्ये **७१ रक्तदात्यांनी रक्तदान** केले.





**को-ऑर्डीनेटर प्रा. मयूर संकपाळ**

कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय * सातारा *

१५. NITI Aayog & Atal Innovation मार्फत Idea Manthan २.० आयोजित केलेल्या Idea Competition मध्ये महाविद्यालयातील मेकनिकल इंजिनिअरिंग, इलेक्ट्रॉनिक अॅण्ड टेलीकम्युनिकेशन इंजिनिअरिंग, कॉम्पुटर सायन्स अॅण्ड इंजिनिअरींग मधील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता यामध्ये तिन्ही विभागाचे ग्रुप Idea Presentation करण्यासाठी चंदीगड इंजिनिअरींग कॉलेज मोहाली येथे निवड झाली.

१६. कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज ऑफ इंजिनिरिंग, सातारा व **इनरव्हील क्लब सातारा** कॅम्प यांच्या संयुक्त विद्यमाने **"डिजिटल व्यसनमुक्ती"** कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते यामध्ये सौ.वैशाली मंडपे मॅडम (संचालक शोरिषा मल्टीमीडिया.,सातारा) यांनी डिजिटल व्यसन टाळण्यासाठी आवश्यक कौशल्ये वाढवण्यावर भर देण्याबाबत मार्गदर्शन केले ज्यामध्ये डिजिटल व्यसनमुक्तीच्या विविध पैलूंबाबत माहिती दिली.




**को-ऑर्डीनेटर - प्रा. वैभव भोसले**

**३**. महाविद्यालयातील शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील प्रथम सत्रामध्ये खालील तक्त्यानुसार विविध कंपन्यामध्ये विद्यार्थ्यांचे Placement झालेले आहे.

Training & Placement Department

**Campus Drive Details A.Y.-2023-24**

| Sr. No. | Name of The Company | Drive Date | Branch | No. of students selected |
|---|---|---|---|---|
| 1 | Hexaware Technologies | 07-Sep-23 | CSE | 4 |
| 2 | Crave InfoTech | 04-Oct-23 | CSE and E&TC | Results Pending |
| 3 | Vidyaleap | 25-Oct-23 | E&TC | 02 |
| 4 | Coditas | 26-Nov-23 | CSE | Drive not yet completed |
| 5 | Jaro Education, Mumbai | 02-Nov-23 | CSE | 1 |
| 6 | Khutale Engineering Pvt.Ltd.,Satara | 03-Nov-23 | Mechanical | 06 |
| 7 | Sankey Solutions, Mumbai | 09-Nov-23 | CSE | 4 |
| 8 | Globalion | 06-Nov-23 | CSE and E&TC | Drive not yet completed |
| 9 | Qspiders, Pune | 10-Nov-23 | CSE and E&TC | 31 |
| 10 | Persistent System, Pune | 15-Nov-23 | CSE and E&TC | Drive not yet completed |
| 11 | Pentagon Space, Bangalore | 05-Dec-23 | CSE | 04 |
| **Total Students Selected** | | | | **52** |

# कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय, सातारा

## *नियामक मंडळ (गव्हर्निंग बॉडी) सभा क्र १०. दि. ३०.१२.२०२३ इतिवृतांत*

४. शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ लोणेरे, आंतरविद्यापीठ विविध झोनल स्पर्धा पार पडल्या. यामध्ये आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी विविध खेळामध्ये खालीलप्रमाणे प्राविण्य मिळविले.

| अ.क्र. | खेळाचे नाव | मानांकन | पुढील स्पर्धेमध्ये निवड झालेल्या विद्यार्थीची संख्या |
|---|---|---|---|
| ०१ | बॅडमिंटन (मुली) | प्रथम क्रमांक | २ |
| ०२ | मैदानी क्रीडा स्पर्धा | 5 - Gold 7 - Silver 3 - Bronze | ६ |
| ०३ | कबड्डी (मुली) | द्वितीय क्रमांक | ३ |
| ०४ | आर्चरी | तृतीय क्रमांक | १ |
| ०५ | बुद्धिबळ | तृतीय क्रमांक | १ |
| ०६ | व्हॉलीबॉल | - | ३ |
| ०७ | क्रिकेट | - | २ |
| ०८ | खो-खो | - | २ |
| ०९ | टेबल-टेनिस | - | २ |
| **एकूण** | | | **२२** |

वरील तक्त्यानुसार महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची झोनल स्पर्धेमधून इंटरझोनल स्पर्धेसाठी निवड झालेली आहे. तसेच आर्चरी या खेळामध्ये आयुष बनकर विद्यार्थ्याची आंतरविद्यापीठ स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

**मा. चंद्रकांत दळवी साहेब चेअरमन रयत शिक्षण संस्था यांच्या सूचनेनुसार महाविद्यालयातील तीन प्राध्यापक व तीन विद्यार्थी यांनी** IIT Bombay **येथे** Techfest **या** Asia's Largest Science & Technological Festival **ला भेट दिली.**





# कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय, सातारा

## *नियामक मंडळ (गव्हर्निंग बॉडी) सभा क्र १०. दि. ३०.१२.२०२३ इतिवृतांत*

महाविद्यालयात आयोजित करणेत आलेले विविध उपक्रमांची माहिती मा. प्राचार्य यांनी सभेस दिली. त्यानुसार सभेने सर्व उपक्रमांबाबत अवलोकन करून त्याबाबत खालील विषयांवर चर्चा करणेत आली.

- मुद्दा क्र. १२ नुसार महाविद्यालयातील संगणक विभागामार्फत One day Webinar on **Generative AI** हा उपक्रम इंडस्ट्री मार्फत दि. २६.०९.२०२३ रोजी आयोजित करणेत आलेला होता त्याबाबत नियामक मंडळाचे चेअरमन मा.ना. दिलीप वळसे पाटील साहेब यांनी महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांसाठी **Artificial Intelligence** या विषयावर मार्गदर्शन सत्र आयोजित करून विद्यार्थ्यांना **Artificial Intelligence** या विषयामुळे भावी आयुष्यात व शिक्षण क्षेत्रात होणारे बदल या विषयी माहिती द्यावी असे सूचित केले आहे.

- महाविद्यालयातील सेवकांनी **Vidya Pratishthan's Kamalnayan Bajaj Institute of Engineering and Technology, Baramati** या कॉलेजला भेट देऊन **Innovation and Incubation Cell** तयार करणे बाबत माहिती घेण्यात यावी व त्यानुसार महाविद्यालयात सदरचे cell सुरु करणेसाठी आवश्यक असणाऱ्या विविध बाबींची पूर्तता करावी.

- महाविद्यालयातील प्रत्येक विभागातील शिक्षक सेवकांनी **Consultancy** करिता काय उपाययोजना केल्या व विभागावार वार्षिक किती **Consultancy** मिळाली याचा अहवाल पुढील नियामक मंडळाच्या सभेमध्ये सादर करावा असे सूचित केले.

- महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे **Placement** हे कमीत कमी ५०% झाली पाहिजे असे सभेने सूचित केले.

- नियामक मंडळाचे सदस्य मा. डॉ. एन. बी. पासलकर यांनी महाविद्यालयात **Drone and Eyantra Lab Develop** करणेसाठी या संदर्भात आय. आय.टी मुंबई आणि श्री. विठ्ठल एज्युकेशन ॲन्ड रिसर्च इन्स्टिट्यूट, पंढरपूर या कॉलेज ला भेट देऊन त्याबाबतची सर्व माहिती घेण्यात यावी. त्यानुसार आपल्या महाविद्यालयात **Drone and Eyantra Lab Develop** चे काम लवकरात लवकर पूर्ण करावे असे चर्चा करून सूचित केले.
- महाविद्यालयातील सर्व विभागप्रमुखांची आपल्या विभागात राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमाचा (**Activity**) रिपोर्ट हा पुढील येणाऱ्या महाविद्यालयीन नियामक मंडळात सादर करावा.

महाविद्यालयामध्ये राबविण्यात आलेल्या उपक्रमाबाबत सर्व संबधित शिक्षक व शिक्षकेत्तर सेवकांचे अभिनंदन

**सूचक :- मा. डॉ. एन. बी. पासलकर**
**अनुमोदक :- मा. प्रतापराव पवार**
**ठराव सर्वानुमते मंजूर**

कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय सातारा

# कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय, सातारा

## *नियामक मंडळ (गव्हर्निंग बॉडी) सभा क्र १०. दि. ३०.१२.२०२३ इतिवृतांत*

**विषय क्र** - ०३. **शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून** Computer Science & Engineering (Artificial Intelligence & Data Science) **नवीन विद्याशाखा सुरु करणे व** Computer Science & Engineering **विद्याशाखेची प्रवेशक्षमता वाढविणे. त्यासाठी लागणाऱ्या प्रयोगशाळा तयार करणे व शिक्षक, शिक्षकेत्तर सेवक भरणेबाबत चर्चा करणे.**

**ठराव क्र ०३**:- महाविद्यालयाचे NBA Accreditation झाल्याने शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून नवीन विद्याशाखेकरिता महाविद्यालय अर्ज करू शकते.

Computer Science & Engineering या विद्याशाखेची सध्याची प्रवेश क्षमता १२० आहे, ती प्रवेश क्षमता ६० ने वाढवून १८० करता येऊ शकते. त्यासाठी जादा प्रयोगशाळा उभारण्याची गरज लागणार नाही.

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून Computer Science & Engineering (Artificial Intelligence & Data Science) हि नवीन विद्याशाखा सुरु करता येऊ शकते. यासाठी नवीन ०६ प्रयोगशाळा उभाराव्या लागतील. त्यासाठी आवश्यक असणारी जागा महाविद्यालयाकडे उपलब्ध आहे. या ०६ प्रयोगशाळा पैकी शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये ०२ नवीन प्रयोगशाळा (Lab) उभाराव्या लागतील त्यासाठी अंदाजे ५० लाख रुपये इतका खर्च अपेक्षित आहे. सदर प्रयोगशाळा उभारणीसाठी येणाऱ्या खर्चाची रक्कम महाविद्यालयाकडे उपलब्ध आहे.

दोन्ही विद्याशाखेची एकूण १२० विद्यार्थी प्रवेश क्षमता वाढल्यास शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता ०६ शिक्षक व ०२ शिक्षकेत्तर सेवक नियुक्त करावे लागतील. यासाठी अंदाजे महिना १,५०,०००/- तसेच वार्षिक १८,००,०००/- इतका खर्च येईल. १२० प्रवेश क्षमतेच्या ८०% म्हणजे १०० प्रवेश झाल्यास महाविद्यालयाचे उत्पन्न अंदाजे १०० लाख रु. वाढेल.

**वरील विषयाबाबत सभेने चर्चा करून महाविद्यालयात** Computer Science & Engineering **या विद्याशाखेची प्रवेश क्षमता १८० करण्यास व** Artificial Intelligence & Data Science **हि नवीन विद्याशाखा सुरु करणेस परवानगी दिली. तसेच आवश्यक असणाऱ्या बाबीं करण्यास व शिक्षक, शिक्षकेत्तर सेवकांची नियुक्ती करणेस सभेने परवानगी दिली.**

**सूचक :- मा. डॉ. एन. बी. पासलकर**
**अनुमोदक :- मा. ना. दिलीप वळसे पाटील**
**ठराव सर्वानुमते मंजूर**

कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय * सातारा *

# कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय, सातारा

***नियामक मंडळ (गव्हर्निंग बॉडी) सभा क्र १०. दि. ३०.१२.२०२३ इतिवृतांत***

**विषय क्र. ४ :- महाविद्यालयातील कार्यरत असलेल्या व सेवानिवृत्त झालेल्या सेवकांनी सादर केलेल्या विविध अर्जांबाबत चर्चा करणे.**

**ठराव क्र. ४ :- १.श्री.सुरवसे गणेश किसन यांनी Software Consultancy चे मानधन मिळणेबाबत सादर केलेल्या अर्जाबाबत चर्चा करणे.**

श्री. सुरवसे गणेश किसन, प्रबंधक यांनी सन २०२०-२१ ते २०२१-२२ या कालावधीत Software Development Cell चे Coordinator म्हणून कामकाज पहिले होते. याकार्यकाळामध्ये महाविद्यालयास मिळालेले उत्पन्न व झालेला खर्चाचा तपशील खालीलप्रमाणे.

| तपशील | २०२०-२१ | २०२१-२२ | एकूण |
|---|---|---|---|
| एकूण उत्पन्न | ७.१५ लाख | ७६.२७ लाख | ८३.४२ लाख |
| वजा -महाविद्यालयाचा ५० % हिस्सा | ३.५८ लाख | ३८.१३ लाख | ४१.७१ लाख |
| वजा - इतर खर्च | ४.४७ लाख | २४.२१ लाख | २८.६८ लाख |
| **शिल्लक** | **- ०.९० लाख** | **१३.९३ लाख** | **१३.०३ लाख** |

वरील तक्त्यानुसार शिल्लक रक्कमेमधून १० % इतकी रक्कम Coordination Charges म्हणून श्री. सुरवसे गणेश किसन यांना देणेबाबत सभेने मार्गदर्शन करावे.

**याबाबत सभेने चर्चा करून Software Development Cell मध्ये सन २०२०-२१ ते २०२१-२२ या कालावधीत केलेल्या कामकाजाचे श्री.सुरवसे गणेश किसन प्रबंधक यांना शिल्लक रक्कमेच्या १०% रक्कम अदा करणेस परवानगी दिली तसेच इथून पुढच्या काळामध्ये देखील जे सेवक Software Development Cell साठी कामकाज करत आहेत अशा महाविद्यालयातील सेवकांना १० % Coordination Charges म्हणून रक्कम अदा करणेत यावी अशी सभेने परवानगी दिली.**

**२. महाविद्यालयातील स्वेच्छा सेवानिवृत्ती घेतलेले डॉ. मांडवे एच.ए. यांनी सादर केलेल्या विविध आर्थिक मागणी बाबत चर्चा करणे.**

डॉ. मांडवे यांनी सहाव्या वेतन आयोगाचा फरक व सातवा वेतन आयोग लागू करून त्यामधील फरक द्यावा अशी मागणी केलेली आहे. अशाच पद्धतीची मागणी इतर शिक्षक व शिक्षकेत्तर सेवकांनी महाविद्यालयात व संस्था प्रशासनास केलेली आहे. महाविद्यालयातील सर्व सेवकांना सदरचा फरक दिल्यास महाविद्यालयावर अतिरिक्त आर्थिक भार पडू शकतो. याबाबत धोरणात्मक निर्णय घेणे आवश्यक आहे. तरी याबाबत सभेने मार्गदर्शन करावे.

**याबाबत सभेत चर्चा करून मागील फरक दिल्यास महाविद्यालयास आर्थिक भार पडू शकतो, त्यामुळे मागील फरक देण्यात येऊ नये असे ठरले.**

**३. महाविद्यालयातील सेवानिवृत्त झालेले डॉ. पाटील सुहास एस. व स्वेच्छा सेवानिवृत्ती घेतलेले डॉ. मांडवे एच. ए. यांनी उर्वरित ग्रॅच्युईटीची रक्कम मिळणेबाबत केलेल्या अर्जाबाबत मार्गदर्शन मिळावे.**

ग्रॅच्युईटीची रक्कम अदा करणेसंदर्भात दळवी समितीने केलेल्या शिफारशी नुसार सदर सेवकांना रु. १० लाख इतकी ग्रॅच्युईटीची रक्कम अदा केलेली आहे. उर्वरित ग्रॅच्युईटीची रक्कम अदा करावी का कसे याबाबत सभेने चर्चा करून मार्गदर्शन करावे.

**याबाबत सभेने चर्चा शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये ग्रॅच्युईटीची रक्कम अदा करणेसंदर्भात दळवी समितीने केलेल्या शिफारशी नुसार ग्रॅच्युईटीची रक्कम १० लाख रु. देण्यात यावी. असा निर्णय झाला आहे. त्यामुळे जास्तीत जास्त १० लाख रु. इतकी रक्कम देण्यात यावी. यापूर्वी ज्या शिक्षक सेवकांना २० लाख रु. ग्रॅच्युईटीची रक्कम देण्यात आली आहे त्यांना १० लाख रु. रक्कम परत जमा करणेस पत्रव्यवहार करावेत असे सभेने सुचवण्यात आले.**

**४. महाविद्यालयात कार्यरत असलेले शिक्षकेत्तर सेवकांना २४ वर्षानंतरची कालबद्ध वेतन श्रेणी लागू करणेबाबत चर्चा करणे.**

महाविद्यालयातील शिक्षकेत्तर सेवकांना नियमानुसार २४ वर्षानंतरची कालबद्ध वेतन श्रेणी लागू करणे आवश्यक आहे. तरी याबाबत सभेने मार्गदर्शन करावे.

**तरी याबाबत सभेने चर्चा करून नियमानुसार पात्र असणाऱ्या महाविद्यालयातील शिक्षकेत्तर सेवकांचे विहित नमुन्यात अर्ज घेण्यात यावेत तसेच त्यांच्या मुलाखती घेऊन पात्र असणाऱ्या सेवकांना २४ वर्षानंतरची कालबद्ध वेतनश्रेणी लागू करणेस सभेने परवानगी दिली.**

**५.कॉम्प्युटर सायन्स & इंजिनिअरिंग या विभागात डॉ. पाटील एस. एस. यांचा प्राध्यापक (Professor) पदाकरिता अर्ज केला आहे याबाबत चर्चा करणे.**

कॉम्प्युटर सायन्स & इंजिनिअरिंग या विभागाची प्रवेश क्षमता १२० आहे. या प्रवेश क्षमतेसाठी ०२ प्राध्यापक ०४ सहयोगी प्राध्यापक व १८ सहाय्यक प्राध्यापक विभागात कार्यरत असणे आवश्यक आहे. परंतु सध्या या विभागात एकही प्राध्यापक कार्यरत नाही व ०१ च सहयोगी प्राध्यापक विभागात कार्यरत आहे. तसेच ०५ सहाय्यक प्राध्यापक नियमित स्वरुपात व १० हंगामी (ADHOC) स्वरुपात कार्यरत आहेत. तरी या विभागात ०१ अनुभवी प्राध्यापक नेमल्यास NBA व NAAC साठी उपयोग होऊ शकतो. यामुळे प्राध्यापक पद संस्थास्तरावर भरणेबाबत सभेने मार्गदर्शन करावे.

**वरील विषयाबाबत सभेने चर्चा करून नियमानुसार रिक्त असलेली प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक, सहाय्यक प्राध्यापक हि पदे भरणेकरिता विद्यापीठाची मान्यता घेऊन रीतसर संस्थेमार्फत जाहिरात देऊन नियमितपणे पदे भरण्यात यावी असे सभेने सूचित केले.**

**६. महाविद्यालयात शैक्षणिक वर्ष २३-२४ करिता नेमणूक केलेल्या हंगामी (adhoc) शिक्षक सेवकांनी पगार वाढीसाठी केलेल्या अर्जाबाबत चर्चा करणे.**

**१.प्रा. गवाळे अमित आर. - सहाय्यक प्राध्यापक**

प्रा. गवाळे अमित आर. हे या महाविद्यालयात गेली ०३ वर्ष सहाय्यक प्राध्यापक म्हणून हंगामी (ADHOC) स्वरुपात कामकाज करत आहे. त्यांचा सध्याचा पगार - २८०८०+१८०० PF आहे. हा पगार जून २०२३ मध्ये वाढविण्यात आलेला आहे. तरी सदर सेवकाने सदरचा पगार मान्य नसल्याने पगार वाढीसाठी अर्ज दिला आहे. याबाबत सभेने मार्गदर्शन करावे.

**सदर सेवकाचा माहे ऑगस्ट २०२३ मध्ये पगार वाढ केली असल्याने याबाबत पुढील पगार वाढीबाबत एक वर्ष पूर्ण झाल्यावर पगार वाढीचा विचार करणेत यावा, असे सूचित केले.**

# कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय, सातारा

## *नियामक मंडळ (गव्हर्निंग बॉडी) सभा क्र १०. दि. ३०.१२.२०२३ इतिवृतांत*

**२.श्री. पाटील संजीव व्ही. - टी. पी. ओ.**

श्री. पाटील संजीव व्ही. हे दि. ०१.१२.२०२२ पासून या महाविद्यालयात टी. पी. ओ. म्हणून कार्यरत आहेत त्यांचा महाविद्यालयाचा ०१ वर्ष व एकूण ०९ वर्षाचा टी. पी. ओ. पदाचा अनुभव आहे. ते महाविद्यालयामध्ये डिसेंबर २०२२ मध्ये कार्यरत झालेले आहेत. त्यांचा सध्याचा पगार ६५०००+१८०० PF आहे. त्यांनी एक वर्ष पूर्ण झाल्याने ३०% पगार वाढीची मागणी केलेली आहे.

महाविद्यालयामध्ये एक वर्ष सेवा पूर्ण झाल्यानंतर सर्व सेवकांचे पगार त्यांचे महाविद्यालयातील कामकाज पाहून वाढविणेत येतात. तरी श्री. पाटील संजीव व्ही. यांची पगार वाढ किती करावी याबाबत सभेने मार्गदर्शन करावे.

**वरील नुसार महाविद्यालयात टी. पी. ओ. म्हणून कार्यरत असलेल्या सेवकाबाबत मा. प्राचार्य यानी सभेस माहिती दिली त्यामध्ये सदर सेवकाचे कामकाज पाहता सभेने १५% माहे फेब्रुवारी २०२४ पासूनच्या पगार वाढ करणेस परवानगी दिली. तसेच यापुढे टी. पी. ओ. यांचा पगार Performance Base वाढविण्यात यावा असे सभेने सूचित केले.**

**सूचक :- डॉ. सौ. माने एस. व्ही.**
**अनुमोदक :- मा. उदय जाधव**
**ठराव सर्वानुमते मंजूर**

# कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय, सातारा

## *नियामक मंडळ (गव्हर्निंग बॉडी) सभा क्र १०. दि. ३०.१२.२०२३ इतिवृतांत*

**विषय क्र.५ :- महाविद्यालयात नियमित शिक्षक व शिक्षकेत्तर सेवक भरणेबाबत चर्चा करणे.**

**ठराव क्र ५ :-** महाविद्यालयातील कायम शिक्षक व शिक्षकेत्तर सेवक हे नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होत आहेत. त्यामुळे महाविद्यालयातील शैक्षणिक व प्रशासकीय कामकाज करणेस अतिशय जिकीरीचे होत आहे. महाविद्यालयातील विविध विभागातील व कार्यालयातील माहिती जतन करणे व सादर करणेसाठी महाविद्यालयाच्या व संस्थेच्या उद्देशाने कायमस्वरूपी व जबाबदार सेवक असणे आवश्यक आहे. सन २०१७-१८ पासून नियत वयोमानानुसार सेवा निवृत्त झालेल्या सेवकांच्या जागेवर किमान ५०% नवीन शिक्षक व शिक्षकेत्तर सेवकांची नियमितपणे भरती करणेस सभेने चर्चा करून मार्गदर्शन करावे.

| अ.क्र. | पद | आवश्यक असणारी सेवक संख्या | नियमित कामकाज करत असलेल्या सेवकांची संख्या | रिक्त असलेली सेवकांची संख्या |
|---|---|---|---|---|
| १. | प्रोफेसर | ५ | ० | ५ |
| २. | सहयोगी प्राध्यापक | १० | ७*+ १ | २ |
| ३. | सहाय्यक प्राध्यापक | ४५ | २१ | २४ |
| **एकूण शिक्षक सेवक** | | **६०** | **२९** | **३१** |
| रिक्त शिक्षक पदे हंगामी (adhoc) स्वरुपात संस्था स्तरावर भरणेत आलेली आहेत. | | | | |
| ४. | लॅब असिस्टंट | २४ | ६ | १८ |
| ५. | वरिष्ठ लिपिक | ४ | ० | ४ |
| ६. | कनिष्ट लिपिक | ४ | ३ | १ |
| ७. | अकौंटं लिपिक | २ | ० | २ |
| ८. | भांडारपाल | १ | ० | १ |
| **एकूण शिक्षकेत्तर सेवक** | | **३५** | **०९** | **२६** |
| रिक्त शिक्षकेत्तर पदांच्या पैकी १५ पदे रोजंदारी तत्वावर भरणेत आलेली आहेत व ०९ पदे रिक्त आहेत. | | | | |

**वरील तक्त्यानुसार मा. प्राचार्य यांनी सभेस माहिती दिली त्यानुसार सभेने चर्चा करून रिक्त पदापैकी ६०% नियमित शिक्षक व शिक्षकेत्तर पदे भरणेसाठी परवानगी दिली. सदर रिक्त पदे भरणेकरिता विद्यापीठाची मान्यता घेऊन रीतसर संस्थेमार्फत जाहिरात देऊन नियमितपणे पदे भरण्यात यावी असे सभेने सूचित केले. तसेच शिक्षकेत्तर पदे त्रयस्थ एजन्सी मार्फत भरण्यात यावीत.**

**तसेच सद्या महाविद्यालयात कार्यरत असलेल्या शिक्षक सेवकांच्या शैक्षणिक अर्हतेनुसार व विद्यापीठ नियमानुसार प्रमोशन देण्याबाबत कार्यवाही करावी, असे सभेने सूचित केले.**

**सूचक :- मा. उदय जाधव**
**अनुमोदक :- मा. विकास देशमुख**
**ठराव सर्वानुमते मंजूर**

कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय * सातारा *

# कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय, सातारा

## *नियामक मंडळ (गव्हर्निंग बॉडी) सभा क्र १०. दि. ३०.१२.२०२३ इतिवृतांत*

**विषय क्र. ६ :- AICTE च्या नियमानुसार महाविद्यालयात Central Store तयार करणे व त्याकरिता आवश्यक भांडारपाल (Store Keeper) च्या नियुक्ती बाबत चर्चा करणे.**

**ठराव क्र. ६ :-** All India Council for Technical Education (AICTE) यांच्या Approval Handbook नुसार महाविद्यालयात Central Store असणे आवश्यक आहे. सध्या महाविद्यालयात भांडारपाल हे पद रिक्त आहे. महाविद्यालयात Central store तयार करणे व त्याकरिता आवश्यक भांडारपाल (**Store Keeper**) ची नियुक्ती करणेबाबत सभेने चर्चा करून मार्गदर्शन करावे.

**याबाबत महाविद्यालयाचे मा. प्राचार्य यांनी सभेस माहिती दिली. त्यानुसार Central Store तयार करणेस परवानगी दिली व आवश्यकतेनुसार भांडारपाल पद हे संस्था नियमानुसार नियुक्ती करणेस परवानगी दिली.**

**सूचक :- डॉ. सौ. मोदी एस. जे.**
**अनुमोदक :- मा. डॉ. एन. बी. पासलकर**
**ठराव सर्वानुमते मंजूर**

**विषय क्र. ७ :- महाविद्यालयातील प्रशासकीय व आर्थिक बाबीविषयी मंजुरी घेणे.**

**विषय क्र. ७.१. - महाविद्यालयातील** Exam Centre Renavation, **क्लासरूम रेनोव्हेशन व बाथरूम रेनोव्हेशन करणेकामी येणाऱ्या जादा खर्चास मंजुरी घेणेबाबत.**

**ठराव क्र. ७.१.** महाविद्यालयात **Exam Centre Renovation**, क्लासरूम रेनोव्हेशन व बाथरूम रेनोव्हेशन बाबत मागील नियामक मंडळाची सभा क्र ०९. दि. ०४.०९.२०२३ रोजी झालेल्या सभेमध्ये विषय ठेवण्यात आला होता. त्यामध्ये सदर विभागाचे रेनोव्हेशन करणेस येणाऱ्या खर्चास परवानगी सभेने चर्चा करून देण्यात आलेली होती. परंतु सदर कामकाजासाठी जादा खर्च होत असल्याने खालील प्रमाणे येणाऱ्या खर्चास परवानगी मिळावी.

| अ.क्र. | विभागाचे रेनोव्हेशन | इस्टेमेट नुसार एकूण होणारा खर्च (अंदाजे) | घेण्यात आलेली परवानगी (अंदाजे) | उर्वरित रक्कम |
|---|---|---|---|---|
| १. | Exam Centre Renovation | १५,११,४००/- | १०,००,०००/- | ५,११,४००/- |
| २. | बाथरूम रेनोव्हेशन (Staff & Student Toilet Block) | २४,७७,०००/- | १६,००,०००/- | ८,७७,०००/- |

महाविद्यालयामध्ये वरील कामे करून घ्यावयाची आहेत दि. ०४.०९.२०२३ च्या सभेमध्ये परीक्षा केंद्रासाठी (Exam Centre) करिता अंदाजे रु. १० लाख व दोन Staff & Student Toilet Block दुरुस्ती करिता अंदाजे रु. १६ लाख इतकी मंजुरी घेण्यात आली होती. अर्कीटेकचर यांच्याकडून अंदाजपत्रक तयार करून घेतले असता परीक्षा विभागासाठी १५ लाख ११ हजार इतका अपेक्षित आहेत व ०३ Staff & Student Toilet Block २४ लाख ७७ हजार रु. इतका खर्च अपेक्षित आहे. यासाठी लागणारी रक्कम महाविद्यालयाकडे उपलब्ध आहे. तरी सुधारित अंदाजपत्रकास मंजुरी मिळावी.

**वरील विषयाबाबत महाविद्यालयातील Exam Centre Renovation करणेसाठी येणारा जादा खर्च ५,११,४००/- व बाथरूम रेनोव्हेशन (Staff & Student Toilet Block) साठी येणारा जादा खर्चास ८,७७,०००/- सभेने चर्चा करून सुधारित अंदाजपत्रकास मंजुरी दिली.**

कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय सातारा

**विषय क्र. ७.२. - महाविद्यालयातील संगणक विभागाकरिता नवीन ४० संगणक खरेदी करणेस परवानगी मिळणेबाबत .**

**ठराव क्र. ७.२. —** महाविद्यालयातील संगणक विभागाची सध्याची प्रवेश क्षमता १२० आहे. त्यानुसार संगणक विभागात १८० संगणक आवश्यक आहेत. सध्या महाविद्यालयाकडे १४० संगणक उपलब्ध आहेत. नवीन अभ्यास क्रमानुसार, नवीन Configuration चे संगणक घेणे गरजेचे आहे. तरी नवीन ४० संगणक संस्था वितरकाकडून खरेदी करण्यास परवानगी मिळावी. यासाठी आवश्यक असणा-या खर्चाची तरतुद करणेत आलेली आहे.

**यावाबत सभेने चर्चा करून महाविद्यालयातील संगणक विभागाकरिता नवीन ४० संगणक हे संस्था वितरकाकडून खरेदी करण्यास परवानगी दिली.**

**तसेच मा. प्रतापराव पवार साहेब यांनी संगणक मिळवणेकरिता विविध कंपन्यांना विनंती पत्र देऊन कंपनी मार्फत संगणक मिळवण्यासाठी प्रयत्न करावे असे सूचित केले.**

**विषय क्र. ७.३. - महाविद्यालयाच्या Building Passage मधील Flooring बदलण्यास परवानगी मिळणेबाबत.**

**ठराव क्र. ७.३.** महाविद्यालय ऑगस्ट २०२४ मध्ये NAAC ला सामोरे जाणार आहे. महाविद्यालयाची इमारत ३५ वर्ष जुनी आहे. त्यामुळे इमारत सुशोभित करणेसाठी Building Passage मधील फरशी बदलणे गरजेचे वाटते. यासाठी अंदाजे रु. ४० लाख इतका खर्च अपेक्षित आहे. यासाठी लागणारी रक्कम पुढील शैक्षणिक वर्षाच्या (२०२४-२५) फी मधून टप्याटप्प्याने उपलब्ध करून देता येऊ शकते. याबाबत सभेने मार्गदर्शन करावे.

**महाविद्यालयातील Building Passage मधील फरशी बदलणे गरजेचे असल्याने याबाबत मा. प्राचार्य यांनी सभेस माहिती दिली. त्यानुसार सभेने चर्चा करून Building Passage मधील फरशी टप्याटप्याने बदलण्यास परवानगी दिली.**

**तसेच मा. चंद्रकांत दळवी साहेब चेअरमन रयत शिक्षण संस्था, सातारा यांनी महाविद्यालयाच्या संपूर्ण इमारतीचा Renovation Plan तयार करावा व पुढील नियामक मंडळाच्या सभेमध्ये सादर करणेत यावा. महाविद्यालय इमारती मध्ये काही बदल करावयाचे असतील तर ते एकसारखे झाले पाहिजेत त्यानुसार आर्किटेक्ट यांच्या कडून Plan तयार करून घ्यावा व त्यानुसार कामकाज करावे असे सुचविले.**

कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय सातारा

# कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय, सातारा

## *नियामक मंडळ (गव्हर्निंग बॉडी) सभा क्र १०. दि. ३०.१२.२०२३ इतिवृतांत*

**विषय क्र. ७.४. - महाविद्यालयात Open Gym Equipment, Training & Placement च्या विभागात Round Table आणि दोन AC आणि Sanitary Napkin Vending Machine खरेदी करणेस परवानगी मिळणेबाबत.**

**ठराव क्र. ७.४. - १. Open Gym Equipment** – महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या मागणीनुसार व विद्यार्थ्यांना Open Gym करणेसाठी Gym Equipment ची खरेदी करणेसाठी अंदाजे ३ लाख इतका खर्च अपेक्षित आहे. तरी Gym Equipment खरेदी करणेस परवानगी मिळावी.

**२. Training & Placement च्या विभागात Round Table आणि दोन AC** – TPO यांच्या मागणीनुसार महाविद्यालयातील विविध विभागातील विद्यार्थ्यांचे विविध कंपन्यामध्ये Placement होत असते. याकरिता विविध कंपनींच्या मार्फत विद्यार्थ्यांच्या मुलाखती व परीक्षा घेण्यात येत असतात. त्यानुसार TPO विभागात Round Table आणि दोन AC खरेदी अंदाजे १.५ लाख इतका खर्च अपेक्षित आहे. तरी या खर्चास सभेची परवानगी मिळावी.

**३. Sanitary Napkin Vending Machine** – महाविद्यालयात Sanitary Napkin Vending Machine आवश्यक असल्याने सदर Vending Machine खरेदी करणेस अंदाजे १ लाख इतका खर्च अपेक्षित आहे. तरी या खर्चास सभेची परवानगी मिळावी.

**वरील मुद्दा क्र. १, २ व ३ नुसार सभेने चर्चा करून Open Gym Equipment, Training & Placement च्या विभागात Round Table आणि दोन AC आणि Sanitary Napkin Vending Machine खरेदी करण्यास व येणाऱ्या खर्चास परवानगी दिली.**

**विषय क्र. ७.५. - महाविद्यालयातर्फे देण्यात येणाऱ्या ERP च्या प्रलंबित बिलाबाबत.**

**ठराव क्र. ७.५.** – रयत शिक्षण संस्थेच्या विविध महाविद्यालयात व शाळांमध्ये कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयातील Software Development Cell मार्फत Rayat ERP Software देण्यात आले आहे. या Software च्या बीलाची रक्कम काही रयत शिक्षण संस्थेच्या काही महाविद्यालयाकडून येणे बाकी आहे त्याबाबतची यादी सोबत जोडली आहे. याबाबत योग्य मार्गदर्शन मिळावे.

| महाविद्यालयाचे नाव | येणे रक्कम |
|---|---|
| कला वाणिज्य महाविद्यालय पुसेगाव | २८२५०/- |
| छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा | २२६१७५/- |
| सदगुरु गाडगे महाराज कॉलेज, कराड | ३००००/- |
| सावित्रीबाई फुले महिला महाविद्यालय, सातारा | २५०००/- |
| श्रीपतराव कदम महाविद्यालय, शिरवळ | १८९४००/- |
| यशवंतराव चव्हाण इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स, सातारा | ७५३६५५/- |
| **एकूण** | **१२५२४८०/-** |

**वरील तक्त्यानुसार रयत शिक्षण संस्थेच्या विविध महाविद्यालयात व शाळांमध्ये Software Development Cell मार्फत देण्यात येणाऱ्या Rayat ERP Software च्या बिलाबाबत संबधित महाविद्यालयांना येणे रक्कम बाबत पत्रव्यवहार करावा व त्याबाबतची माहिती संस्था कार्यालयास देण्यात यावी असे सभेने सुचविले.**

**सूचक :- डॉ. सौ. माने एस. व्ही.**
**अनुमोदक :- मा. विकास देशमुख**
**ठराव सर्वानुमते मंजूर**

कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय सातारा

**विषय क्र. ०८ - मा. चेअरमन याचे परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयावर चर्चा करणे.**

**विषय क्र. ८.१ संगणक विभाग नुतनीकरणास आलेल्या वाढीव खर्चास परवानगी मिळणेबाबत.**

**ठराव क्र. ८.१.**— महाविद्यालयातील संगणक विभाग नुतनीकरण करण्यासाठी अंदाजपत्रकानुसार रयत शिक्षण संस्थेने रक्कम रुपये 4915012 /-(18 % GST वगळुन) मंजूर करण्यात आले होती, सदरचे कामकाज हे रक्कम रुपये 3600000/- + 18 %GST = 424800/- नुसार ऑनलाईन टेंडर द्वारे निवेदाधारकास देण्यात आले होते. परंतु संगणक विभागात POP व वाढीव पार्टिशन केल्यामुळे हे काम रक्कम रुपये 6247328/- (१८% GST रक्कमेसह) इतके होत असून वाढीव खर्चास चर्चा करून मार्गदर्शन मिळावे.

**संगणक विभाग नुतनीकरण करण्यासाठी आर्किटेक्ट यांच्या कडून मागविण्यात आलेल्या अंदाजपत्रकात GST रक्कम घेण्यात आली होती परंतु संस्था मंजुरी पत्रामध्ये GST रक्कमेचा उल्लेख नाही. तरी GST रक्कम व संगणक विभागात POP आणि वाढीव पार्टिशन केल्यामुळे जादा खर्च झाला आहे.**

**तरी सदर खर्चा बाबत सभेने चर्चा करून झालेल्या वाढीव खर्चास परवानगी दिली.**

**विषय क्र. ८.२ नवीन इलेक्ट्रिकल 90, 120 Square MM Aluminium Armad Cable खर्चास परवानगी मिळणेबाबत.**

**ठराव क्र. ८.२.** — महाविद्यालयातील विजेचा पुरवठा खंडित झाला असता महाविद्यालयात उपलब्ध असलेल्या जनरेटर 85 KV चा असून त्यावर सर्व इमारतीचा इलेक्ट्रिकल लोड येत असल्याने व महाविद्यालयात विजेचा वापर जास्त वाढल्याने जनरेटर सुरु केल्यास जनरेटरवर लोड येवून जनरेटर वारंवार नादुरुस्त होत आहे नवीन जनरेटर जादा Capacity चा खरेदी खरेदी केल्यास त्यास डीजेल जास्त लागणार आहे त्यामळे महविद्यालयातील आवशक विभागात हे जनरेटर सुरु ठेवण्यासाठी व इमारती मधील लोड व्यवस्थित वितरीत होण्यासाठी नवीन इलेक्ट्रिकल 90, 120 Square MM Aluminium Armad Cable कोटेशन मागवून संस्था नियमानुसार खरेदी करण्यात आली आहे सभेने चर्चा करून मार्गदर्शन करावे.

**सदरचा खर्च हा महाविद्यालयाच्या Maintenance खर्चामधून केला असून सदरच्या खर्चास सभेने चर्चा करून परवानगी दिली.**

**विषय क्र. ८.३ महाविद्यालयाचे वस्तीगृह यशवंतराव चव्हाण सायन्स कॉलेज, सातारा यांना वापरण्यास दिल्या बाबत.**

**ठराव क्र. ८.३.** — महाविद्यालयाचे वस्तीगृह यशवंतराव चव्हाण सायन्स कॉलेज, सातारा यांना संघटक मा. डॉ. अनिल पाटील साहेब यांच्या सूचनेनुसार व प्राचार्य यशवंतराव चव्हाण सायन्स कॉलेज, सातारा यांच्या विनंती पत्रानुसार ११ खोल्या वापरण्यास दिल्या आहेत.

**सदरचा विषय सभेच्या माहितीसाठी ठेवण्यात आला होता. तरी सदर विषयाचे सभेने अवलोकन केले.**

# कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय, सातारा

*नियामक मंडळ (गव्हर्निंग बॉडी) सभा क्र १०. दि. ३०.१२.२०२३ इतिवृतांत*

**विषय क्र. ८.४. भविष्य निर्वाह निधी, कोल्हापूर यांच्या कडून आलेल्या PF दंड भरणेस परवानगी मिळणे बाबत.**

**ठराव क्र. ८.४.** — मार्च २०१० ते जुलै २०२१ या कालावधीतील भविष्यनिर्वाह निधी दंडाची रक्कम रु. २१,१६,०२३/- भरणेसाठी नियामक मंडळाची सभा क्र. ०८ दि. १६.०२.२०२३ मधील विषय क्र. १४.०१ नुसार परवानगी दिलेली होती. त्यानुसार संस्था कार्यालयाने व्याज रक्कम भरून दंडव्याज रक्कम कमी अथवा माफ करणेसाठी कायदेशीर सल्ला घेऊन पुढील कार्यवाही करणेस मंजुरी दिलेली होती. त्यानुसार महाविद्यालयाने कोल्हापूर येथील कायदेशीर सल्लागार श्री. दीपक दोशी यांच्या मार्गदर्शनानुसार पी.एफ. कार्यालयाशी सदर दंडव्याज रक्कम कमी अथवा माफ करणेसाठी पत्रव्यवहार केला. यासंदर्भात पी.एफ. कार्यालयाने एकूण ५ वेळा सुनावणी घेतली आणि यासंदर्भात महाविद्यालयास लेखी म्हणणे सादर करावयास सांगितले. यासंदर्भात पी.एफ. कार्यालयाने मागील आठवड्यात अंतिम आदेश पाठवून सदर रक्कम भरावी लागेल असे कळविले आहे. तरी दंडव्याजाची बाकी रक्कम रु.११,२२,२२२/- (डिग्री रु.६,९७,०३८/- आणि डिप्लोमा रु.४,२५,१८४/-) भरणेस सभेची परवानगी मिळावी.

**याबाबत सभेने चर्चा करून भविष्यनिर्वाह निधी यांच्या कडून आलेल्या पत्रानुसार दंडव्याजाची बाकी रक्कम रु.११,२२,२२२/- पैकी डिग्री विभागाची रक्कम रु. ६,९७,०३८/- भरणेस परवानगी दिली.**

**सूचक** :- **डॉ. सौ. मोदी एस. जे.**
**अनुमोदक** :- **मा. प्रतापराव पवार**
**ठराव सर्वानुमते मंजूर**

**प्राचार्य तथा सचिव**
नियामक मंडळ (गर्व्हनिंग बॉडी)
कर्मवीर भाऊराव पाटील
अभियांत्रिकी महाविद्यालय, सातारा